Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026

Original Article

# नव्वदोत्तरी मराठी दलित नाटकातील प्रयोगशीलता

**डॉ. राजश्री पराग देशपांडे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,फर्ग्युसन महाविद्यालय पुणे
**Email:** dr.rpdeshpande9@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180302
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 3(A)
Pp. 7-10
March- 2026
**Submitted:** 15 Feb. 2026
**Revised:** 25 Feb. 2026
**Accepted:** 10 Mar. 2026
**Published:** 31 Mar. 2026

***सारांश***

*नव्वदोत्तरी मराठी दलित नाटकांमध्ये सामाजिक वास्तव, अन्याय-अत्याचार, जातीयता, विषमता आणि दलितांच्या जीवनातील संघर्ष यांचे प्रभावी चित्रण आढळते. फुले-शाहू-आंबेडकरांच्या समतावादी विचारसरणीचा प्रभाव दलित नाटकांवर स्पष्टपणे दिसून येतो. दलित नाटककारांनी नाटकाला केवळ मनोरंजनाचे माध्यम न ठेवता समाजजागृतीचे प्रभावी साधन बनवले आहे. प्रेमानंद गज्वी, दत्ता भगत, टेक्सास गायकवाड, संजय पवार, प्रज्ञा पवार आदी नाटककारांनी तळागाळातील लोकांच्या व्यथा, वेदना, संघर्ष आणि सामाजिक अन्याय यांना नाट्यरूप दिले. 'वाटा-पळवाटा', 'मन्वंतर', 'कोण म्हणतं टक्का दिला', 'युगयात्रा', 'धादांत खैरलांजी' यांसारख्या नाटकांमधून जातीयता, आंतरजातीय विवाह, सामाजिक परिवर्तन, राजकीय ढोंग आणि दलितांवरील अत्याचार यांचे वास्तववादी चित्रण दिसते. नव्वदोत्तरी दलित नाटकांमध्ये तंत्र, आशय, शैली आणि प्रयोगशीलतेतही लक्षणीय बदल झालेले दिसतात. या नाटकांनी सामाजिक बांधिलकी जपत समतावादी विचारांचा प्रचार केला असून दलित रंगभूमीला नवीन दिशा दिली आहे.*

***कीवड्र्स :****नव्वदोत्तरी दलित नाटक, मराठी दलित साहित्य, दलित रंगभूमी, प्रयोगशीलता, सामाजिक विषमता, जातीयता, आंबेडकरी विचार, समाजपरिवर्तन.*

## प्रस्तावना

फुले, शाहू, आंबेडकरांनी जी सामाजिक समतेची चळवळ सुरू केली, त्या चळवळीमुळेच भारतातील गरीब, शोशित, उपेक्षित, दलित, आदिवासी, कामगार, भटके, स्त्रिया आदी घटकांना आत्मभान आले. ते सजग झाले. म. फुल्यांनी शिक्षणाचे महत्त्व बहुजनांना पटवून दिले. शिक्षण हे समाजसुधारणेचे प्रवेशव्दार आहे. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. अज्ञान हेच आपल्या सर्वच क्षेत्रातील अधोगतीचे कारण आहे. हे ओळखून सामान्य माणसाला शिक्षण देऊन जागृत केले. महात्मा फुल्यांना गुरू मानून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या कार्याचा वारसा पुढे चालविलेला आपल्याला दिसतो.

या देशातील सामान्य माणसाला माणूसपण देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. अन्याय करणाऱ्यापेक्षा अन्याय सहन करणारा अधिक दोरु◌ी आहे. त्याला आत्मभान देण्याचे काम वरील महामानवांनी केले. गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो पेटून उठतील ही शिकवण आंबेडकरांनी शोरिातांना करून दिली. त्यामुळे त्यांच्यात जागृत्ती निर्माण झाली. त्यांना आत्मभान आले. तो अन्यायाच्या विरोधात दंड थोपटून उभा राहिला. त्यात अनेक शाहीर आघाडीवर होते. त्यात 'जलसा'च्या माध्यमातून जनजागृत्ती सुरू असल्याचेही आपल्याला दिसून येते. अनेक जलसेकारांनी जलशांच्या माध्यमातून महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार केला. या चळवळीपासून प्रेरणा घेऊन अनेक दलित नाटककारांनी नाटयलेखन केले. नव्या तंत्राचा नाटकात अवलंब केला.

## आशयविश्लेषण

दलित नाटक केवळ मनोरंजनासाठी नसून समाज जागृत्तीसाठी असते, हे त्यांनी ठामपणे समाजाला दाखवून दिले.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. राजश्री पराग देशपांडे, सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, फर्ग्युसन महाविद्यालय पुणे*

**How to cite this article:**
*देशपांडे, . राजश्री . पराग . (2026). नव्वदोत्तरी मराठी दलित नाटकातील प्रयोगशीलता. Journal of Research & Development, 18(3(A)), 7–10. https://doi.org/10.5281/zenodo.19606517*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19606517
OPEN ACCESS

त्यात प्रेमानंद गज्वी, दत्ता भगत, टेक्सास गायकवाड, हेमंत खोब्रागडे, कमलाकर डहाट, रामनाथ चव्हाण, लक्ष्मण माने, संपत जाधव, प्रकाश त्रिभुवन, रतनलाल सोनाग्रा, संजय पवार, प्रभाकर दुपारे आदी नाटककारांनी भूमिका घेउन लेखन केलेले दिसते. या नाटककारांनी तळागळातील माणसांचे जीवन, त्यांच्या व्यथा, वेदना, दु:ख, उपासमार, अपमान आणि शोरुण यांना त्यांनी नाटकातून वाचा फोडली. आतापर्यंत ज्या दीन-दलितांच्या जीवनाकडे कोणाचेही लक्ष नव्हते. ज्या अंधारमय जीवनाला प्रकाशमय करण्यासाठी या दलितांनी नाटककारांनी प्रकाशत आणले. या नाटयलेखनात सवर्णाकडून होणारा छळ, पिळवणूक यांचे चित्रण प्रभावीपणे तर कधी व्यंगात्मक पद्धतीने चपखलपणे केलेले आपल्याला दिसून येते. 'दलितांची अस्मिता' व 'आत्मशोधा'साठी दलित नाटककारांनी रंगभूमीचा माध्यम म्हणून अतिशच चपखलपणे वापर केला आहे.

प्रस्थापितांचा दलित नाटकाकडे पाहण्याचा द्रुरुटिकोण हा सनातनी आहे. सुरूवातीच्या काळात दलित रंगभूमीची दखल प्रस्थापित रंगभूमीने घेतली नाही. ज्यांनी घेतली त्यांनी मात्र हिनवण्याच्या पलीकडे दुसरे काहीच केले नाही, परंतु त्यातूनही दलित नाटककारांनी माघार न घेता किंवा खचून न जाता तेवढयाच जोमाने लेखन चालू ठेवले व दलित नाटयक्षेत्रात आपला एक वेगळा ठसा उमटवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच दलित नाटक तेवढयाच झपाटयाने विकसीत होताना दिसत आहे. परंतु दलित नाटककारांना आता आवश्यकता आहे ती समीक्षकांची व ती पूर्तता देखील दलित साहित्यिकांनाच पूर्ण करावी लागेल. कारण तेवढयाच द्रुरुटिकोणानाने साहित्याकडे बघणे आता प्रस्थापितांना अशक्य होत असल्याने ती जबाबदारी दलित समीक्षकांनाच पूर्ण करावी लागणार आहे. त्याचे कारणही असेच आहे की, दलित नाटकारांच्या नाटकांची समीक्षा दलित समीक्षकच जेवढया समर्थपणे करतील तेवढी समीक्षेची विशेरुात: दलित जाणिवांच्या बारकाव्यांची त्यांना द्रुरुटी असेलच असे नाही. दलित समीक्षकांना प्रस्थापित समीक्षकांपेक्षा दलित साहित्याची जास्त जाणीव असल्याने ते तेवढया ताकतीने समीक्षा करू शकतील, यात वाद नाही.

वाटा-पळवाटा दलित नाटककारांनी रंगभूमीला उभारी दिली. प्रेरणा दिली. त्या प्रमुख नाटककारांपैकी दत्ता भगत हे एक नाव. एक प्रतिभा संपन्न नाटककार म्हणूनही त्यांची ख्याती आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर जे राजकारण, समाजकारण झाले त्यातून वाहणारे बदलाचे वारे व त्यातून शोधल्या गेलेल्या रितसर पळवाटा हा विरुाय घेऊन दत्ता भगत हे आंतरजातीय विवाहाचे समर्थन करत त्याद्वारे समस्या रंगमंचावर चित्रित करण्यात यशस्वी झाले आहेत. हेही तेवढेच खरे. हे नाटक आपल्या नेत्यासाठी प्राणपणाला लावून लढणारे संसारापेक्षा विचार, नेता, चळवळ, समाजपरिवर्तन जागृतीची मशाल तेवत ठेवणाऱ्या पहिल्या पिढीचे प्रतिनिधीत्व करते. तर वैचारिक ताकद पुरवणारी, चालना देणारी प्रा. सतीश गोडघाटे यांची दुसरी पिढी. प्रा. सतिश गाोडघाटे हे दुसऱ्या पिढीचे प्रतिनिधीत्व करतात. कोणत्याही प्रश्नांचा गांभीर्याने विचार करणारी, आर्थिक स्थैर्य लाभलेली ही पीढी आहे.अर्जुनची तिसरी पिढी मात्र लोकशाही मूल्यांवरचा विश्वास उडालेली. लोकशाहीने आम्हांला काय दिले? असा खोचक सवाल करणारी आहे. या तीनही पिढयांवर वैचारिक प्रकाश टाकणारे दत्ता भगत हे एक प्रतिभा संपन्न लेखक म्हणून आपल्यासमोर येतात. आंतरजातीय विवाहामध्ये तरूण-तरूणी फसतात हे मत चुकीचे असल्याचे नाटककार तेवढयाच समर्थपणे मांडताना दिसतात. सुधारणेच्या कोणी कितीही गप्पा मारल्या तरी दलितांना न्याय मिळत नसल्याची खंत नाटककाराला आहे. अर्जुनला महाविदयालयातून काढून टाकण्याची शिफारस करणे, त्याला खोटया प्रकरणात अडकवणे, गोर-गरिबांना घरे नाकारून वशिल्याने नको त्यांना घरे देण्याचा प्रयत्न करणे हे प्रकार खूप प्रमाणावर चालू आहेत.

'वाटा-पळवाटा'मध्ये दत्ता भगत यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर त्यांचे अनुयायी कृती करण्याऐवजी 'वाटा-पळवाटा' कशा शोधत आहेत. याचे देखील चित्रण कले आहे. शिक्षणासारख्या पवित्र समजल्या जाणाऱ्या क्षेत्रातील पाविरुय नरुट होते की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली. पवार साहेबांसारखे शिक्षण सम्राट शैक्षणिक संस्थाचे अध्यक्ष झाले आणि आपणास हव्या त्या पद्धतीने माणसे हाताशी धरून प्रा. सतिश गाोडघाटे सारख्या माणसाला दबाव आणून अर्जुनला महाविदयालयातून काढून टाकण्याचा प्रयत्न झाला. याचे चित्रणही या नाटकात समर्थपणे येते. मन्वंतर हे टेक्सास गायकवाड यांचे आत्मकथनात्मक नाटक आहे. लेखकाच्या जीवनात घडलेल्या वास्तव घटनांचे दर्शन या नाटकात बघायला मिळते. या नाटकात गिरीशला नाटकाचे वेड आहे. त्याचे कालंतराने ताराच्या ओळखीचे रूपांतर प्रेमात कधी होते ते कळत नाही. गिरीश दलित आणि तारा ब्राम्हण असल्यामुळे ताराच्या घरून त्यांच्या आंतरजातीय विवाहाला तीव्र विरोध होतो व नंतर गिरीश व तारा ऐकत नाहीत व आंतरजातीय विवाह करण्याचे ठरवतात. परंतु बाळू मामा व कुसुमताई यांना ताराने जाती बाहेर जाऊन विवाह करावा हे सहन होत नाही. काका, ताराचे वडील आधुनिक विचारांचे सुधारणावादी आणि व्यक्ती स्वातंरुयाचा विचार करणारे आहेत. बाळू मामा, कुसूमताई हे पात्र परंपरावादी, सनातनी विचारांचे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीशी प्रामाणिक राहून तो काम करतो. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'ब्राम्हण' वाईट नसून 'ब्राम्हणशाहीला' विरोध केला हे उचित आहे. अतरजातीय विवाहामुळे फक्त दोन जीव एकत्र येतात असे नाही तर समाजातील, देशातील जातीयता, जर हा जातीवादी विचार संपवायचा असेल तर रोटी-बेटी व्यवहार, आंतरजातीय विवाहाची कशी नितांत गरज आहे हे नाटककाराने दाखवून दिले आहे.कोण म्हणतं टक्का दिला हे संजय पवार यांचे नाटक. ते एक धडाडीचे लेखक, त्याच बरोबर वैचारिक लेखन करणारे समीक्षक, चित्रपट, संवादलेखक अशी त्यांची ख्याती आहे. नाटककार म्हणून संजय पवारांचे नाव साहित्य क्षेत्रामध्ये आदराने घेतले जाते. त्यांच्या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026

लेखनीला एक प्रकारची धार आहे. संजय पवारांचे शब्दसामर्थ्य व शैली ही चपखल व सहजरित्या डोळयात भरणारी व शब्द सामर्थ्य संपन्न असल्याने त्यांचा वाचक वर्गही तेवढा जास्त आहे.

वर्गविहीन समाजरचना हे आपल्या सामाजिक लोकशाहीत परावर्तीत झाली नाही. वर्गविहीन समाजरचना हे आपल्या लोकशाहीचे स्वप्नच राहिले आहे. कायद्याने जातीयता दूर करण्याचा प्रयत्न झाला, परंतु माणसाच्या मनातून ती गेलीच नाही हे आपल्या देशातील धगधगीत वास्तव आहे. हेच वास्तव संजय पवार यांनी आपल्या नाटकातून मांडले आहे. या नाटकाचे कथानक हे कमलाकर आराध्ये यांच्या मुंबईच्या घरात घडते. हे घर ब्राम्हण कुटुंबाचे आहे. शासन पातळीवर एक निर्णय होतो की, आपल्या देशात एकात्म समाजाचे दर्शन जगाला घडावे. विमलाबाई जात लपवून सरकारला फसवण्याचा प्रयत्न करते. कमलाकरला बायकोचा निर्णय पटत नाही. सुदर्शनचे विचार हे परंपरावादी आहे. तो म्हणतो, दलित म्हणजे नेमके काय? त्या यंत्राचा वापर कसा करायचा अशी वेगवेगळी शकली असणारी चर्चा होते.

युगयात्रा म. भि. चिटणीस यांचे हे नाटक. नाटकाची सुरूवातच रामायनतील शूद्र शंबुकाच्या हत्येच्या प्रसंगाने होते. 'वाग्भट' व 'इंद्रभट' रामचंद्राला राज्यात अधर्म वाढल्याचे सांगतात. त्या वेळीच एका ब्राम्हण मुलाचा मृत्यू होतो. त्याचे कारण शुद्राचे वर्णाला धरून वर्तन नाही असा अर्थ घेतला जातो. त्यामुळे राजाला राग येऊन तो शुद्र असणारा शंबुक तपश्चर्येला बसलेला असल्याने हा अनर्थ घडला आहे. असे कळल्यावर राम शंबुकाचा वध करतो. प्रसन्न झालेल्या देवाकडे ब्राम्हण मुलाला जिवंत करण्याचा वर मागतो. हजारो वर्ाांपासून चालत आलेल्या व मानत आलेल्या धर्म ग्रंथाच्या पाणापानावर विरुामता व जातीयता ओतप्रोत भरलेली बघायला मिळते. शुद्रांना तपश्चर्येचा अधिकार नाकारला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृती जाळून शेवटला नेले. हा या समाजातील एक खूप मोठया परिवर्तनाचा भाग होता, हे विसरता येत नाही.

युगयात्रा या नाटकामध्ये दलितांच्या शोरुाणाला कारणीभूत असणाऱ्या आणि स्वातंत्र्य नाकारणाऱ्या प्रवृत्तीला विरोध करून स्व-कर्तृत्त्वाने ज्ञानाच्या बुद्धी सामर्थ्याच्या जोरावर त्या काळातही आणि आजही ज्ञान होणे हे कोणत्याही वर्गाची, वर्णाची, जातीची मक्तेदारी नक्कीच नाही. तपस्वी शंबूक, संत चोखामेळा, दुरुकाळात गावाला जीवदान देणारा विठू महार, कोटयवधी दलितांना आत्मभान आणणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि चातुवर्ण व्यवस्था अमान्य करून देव नाही. आत्मा नाही पाप-पुण्य, स्वर्ग-नरक या संकल्पनांना मुठमाती देऊन जगातील मानव जातीला जोडण्याचे काम करणारे शांतीदूत महात्मा गौतम बुद्ध यांनी केले. परंतु समतेच्या राज्यासाठी धडपडणाऱ्या युगनायकांनी समाज जागृतीसाठी व समाज हितासाठी कार्य करणाऱ्यांना सनातनीकट्टरता वाद्यानी संपवण्याचा प्रयत्न केला. पण या सर्वांना आणि सनातन्यांच्या कट्टर व कडवटपणाचा विरुाय समोर ठेऊनच युगयात्रा ही प्रकाशाच्या दिशेने वाटचाल करते आहे. हे देखील तेवढेच महत्त्वाचे आहे.

धादांत खैरलांजी प्रज्ञा पवार यांनी 'धादांत खैरलांजी' हे नाटक लिहिले आहे. हजारो वर्ापासून इथल्या अस्पृश्य, दलित वर्गावर अन्याय, अत्याचार होत आला आहे. यातूनच जातीय दंगली, संघर्ा वारंवार झाला आहे. आजही या देशात समाजमत जातीयतेच्या, अस्पृश्यतेच्या, विरुामतेच्या पाशवी कचाटयातून सुटू शकले नाही. या सर्व बाबींचा विचार समोर ठेवून प्रज्ञा पवार यांनी 'धादांत खैरलांजी' या नावाचे नाटक लिहिले आहे. आपण सद्य:स्थितीमध्ये 'जात' संपली आहे, असे ज्यावेळी म्हणतो त्यावेळी तिचे सावट राजकारणी लोकांमध्ये सहज पाहावयास मिळते. याचे कारण आपल्या मतपेटीवर डोळा ठेवून राजकारणी लोक जात टिकून राहण्यासाठी वारंवार प्रयत्न करतात. खैरलांजी हत्याकांड घडल्यानंतर अनेक चर्चा राजकीय वर्तुळात उठल्या गेल्या. कोणी ज्या भोतमांगे कुटुंबातील आई आणि मुलीची हत्या झाली, त्यांच्या संदर्भातही वेगळी चर्चा करण्याचा प्रयत्न झाला. त्यांच्या चारिरुयावर शिंतोडे उडवण्याचे जाणीवपूर्वक काम करण्यात आले, हे दलितांच्याबाबत आताच होते आहे असे नाही, तर मूळ विरुायाला रीतसर बगल देण्यासाठी या अशा चुकीच्या अफवा उडवल्या जातात. खैरलांजी हत्याकांडाच्या घटनेविरोधात घटनेला दाबवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न झाला.

प्रज्ञा पवार यांचे 'धादांत खैरलांजी' या नाटकात खैरलांजी हत्याकांडाच्या अनुरुांगाने घडलेल्या अनेक घटना, प्रसंगावर हे नाटक भारुय करते. 'वैशाली' ही एका कॉलेजमध्ये प्राध्यापिका आहे. ती दलित आहे. खैरलांजी हत्याकांडाच्या घटनेच्या विरोधात देशभर अनेक ठिकाणी चळवळी, निदर्शने झाली. त्यात प्रा. वैशाली सक्रिय सहभाग नोंदवते. तेव्हा वैशालीला व्यवस्थापन किरकोळ मुद्यांचे निमित्त करून बडतर्फ करण्याचा निर्णय घेते. यावरून हे स्परुट होते की, खैरलांजी देशाच्या अनेक भागात वेगवेगळया पध्दतीने सुरू आहे. त्याच बळी दलितांचाच जातो. सद्य:परिस्थीतीत शिक्षण संस्थामध्ये कोणीही जर तुमच्या पाठीशी नसेल तर संस्थाचालक तुमच्या नोकरीची 'वाट' लावल्याशिवाय राहत नाहीत. त्यांना हवा असतो प्रवाहात सामील होणारा नोकरदार. 'हो'ला 'हो' म्हणनारा. 'धादांत खैरलांजी' या नाटकामध्ये अमिताभ आणि वैशाली अनेक घटनांवर समाजातील निरनिरळया ज्वलंत विरुायावर विचार करतात. अमिताभ आनंदजीच्या सिनेमाच कथानक आपल्यापरीने बदलण्याचा प्रयत्न करतो, परंतु शेवटी त्याच्या लक्षात हे येते की, हा प्रश्न फक्त साहित्यांकापुरताच मर्यादित नसून चळवळीत काम करणारे परिवर्तनवादी, सुधारणावादी, सामाजिक बदल घडवण्यासाठी पुढे आलेल्या प्रत्येकाचाच आहे. एक आकराळविकराळ प्रश्नचिन्ह खैरलांजीसारख्या घटना उभ्या करतात. त्यामुळे तो संहिता फाडून टाकतो. वैशाली आंबेडकरी चळवळ, आंबेडकरी राजकण आणि साहित्याची कोंडी कशी झाली यावर विचार मांडते. वैशालीला वाटते की भोतमांगे कुटुंबाची झालेली शोकांतिका आणि स्वत:चा प्रश्न वेगळा मुळी नाहीच. रणजित काकांनी एक फोन केल्यावर सगळया प्रश्नाचा गुंता सुटला

पण खैरलांजी हत्याकांडाच्या प्रश्नाचं काय? हा प्रश्न तसाच अनुत्तरीत राहतो. या देशात ज्याला कोणीच वाली नाही, त्याला न्याय मिळेल का? हा देखील प्रश्न उरतोच. एकंदरीत दलितांना या देशात स्वातंत्र्य मिळालेले नाहीच, हेही मान्य करावे लागते. खैरलांजी हे नाटक या सर्वांवर एका वास्तव घडलेल्या घटनेसारखे प्रकाश टाकत नाही तर घडलेल्या घटना, प्रसंगाची चर्चा करते. तशी चर्चा तर प्रत्येक ठिकाणीच होते.नव्वदोत्तरी दलित नाटकातील तंत्र आणि प्रयोगातील बदलदलित रंगभूमीवरील नाटकांच्या विरुायासंदर्भात चर्चा करावयाची झाल्यास नाटकातील तंत्र आणि प्रयोगशीलतेतील बदलाबाबतचा विचार करणे महत्त्वाचे आहे. ही चर्चा करताना दलित नाट्य सादरीकरणाचे लेखनशैलीचे विरुाय, अनुभव, आशय, अभिव्यक्ती, अभिरूची, प्रयोग या सर्वांकडे बारकाईने पाहणे गरजचे आहे. संस्कृत नाटक, परंपरागत नाटक आणि दलित नाटक असा विचार केल्यास 'दलित नाटक' हे इतर नाटकांपेक्षा सहज वेगळे पडते. या नाटकातील विरुाय, आशय, अभिव्यक्ती, नाटयकला वास्तव बनवण्यासाठी सहज हातभार लावते, हेही तेवढेच खरे! या प्रयोगात एक जिवंतपणा आहे. सकसपणा, अनुभव संपन्नता व कलात्मकता यातून मिळवणारा आनंद जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करण्यात दलित नाटककार यशस्वी ठरले आहेत. दलित रंगभूमीच्या परिवर्तनशीलतेचा विचार करताना अभ्यासक, समीक्षकाचा यांचा कस लागतो. परिवर्तनाच्या संबंधात जोडताना नव्या विरुायाचे, आशयाचे, शैलीचे आणि मांडणीचे आवाहन पेलते. साचले पणाच्या, तोच तो पणाच्या आरोपांकडे लक्ष न देता स्थितीगतीला छेद देऊन मनोरंजन आणि करमणूक या मूल्यांपेक्षा सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून दलित रंगभूमी परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करत आलेली आहे, हे देखील तितकेच खरे आहे. दलित रंगभूमीवरील नाटक पाहिल्यास 'थांबा राम राज्य येतयं', 'किरवंत', 'बामनवाडा', 'योद्धा', 'मन्वंतर', 'कोण म्हणतं टक्का दिला' यांसारखी नाटके एका वेगळया ढंगाची वाट चोखाळताना दिसतात. 'वाटा-पळवाटा', 'धादांत खैरलांजी', या नाटकांमधून त्यांच्या सादरीकरणाच्या पद्धती व तंत्र वास्तवाच्या जवळपास जाण्याचा प्रयत्न करताना दिसते. समाजपरिवर्तन आणि चळवळीसंदर्भात दलित रंगभूमी समाजातील सद्य:स्थितीतील ज्वलंत प्रश्न आणि समस्या समर्थपणे हाताळत आहे. दलित नाटकांची एक आणखी खासीयत आहे, ती म्हणजे सादकरीणासाठी थिअटरची गरज या नाटकांना कधी पडत नाही. त्यांचे गावोगावी उघडया रंगमंचावरही प्रयोग सादर झालेले आहेत. या प्रयोगातून ज्वलंत व सामाजिक विरुाय हाताळले आहेत. राखीव जागा, नामांतर प्रश्न, आंतरजातीय विवाह, अंधश्रद्धा, स्त्रियांच्या समस्या, भ्ररुट समाजव्यवस्था, राज्यकर्त्यांची दांभिकता आदी भूमिका या नाटांनी मांडलेल्या आहेत. प्रयोगात त्यांनी जीवनाचा, धर्म-संस्कृती, परंपरांचा, संघर्ुाचा दलित रंगभूमीच्या माध्यमातून शोध घेतलेला आहे.

**निष्कर्ष**

नव्वदोत्तरी नाटकांचा आढावा घेतला आहे. नाटकांमधील विषयाला साजेसी अन्याय, अत्याचार, रूढी, अंधश्रद्धा, विरुामता, जातीयता, शोरुाण, पलायणवाद, नामांतर, लढा, सवलतींची पोटदुखी, आंतरजातीय विवाह या विरुायाबरोबरच दुर्लक्षित सर्वच विरुायांना नाटककारांनी स्पर्श केलेला आहे. दलित रंगभूमीवरील नाटकाचे तंत्र व प्रयोगातील जो बदल झाला. आपण त्या बदलाचा देखील विचार केलेला आहे. या नाटकांना अजून जिवंतपणा येतो तो या नाटकातील भारुाशैलीमुळे. या नाटकांची भाषाशैली ही निश्चितच आपल्याला नाटयरंगभूमीवर नाटक पाहताना वास्तवाचा अनुभव भावनिक पातळीवर व्यक्त झाल्याचा अनुभव सहज देऊन जाते. दलित नाटकाचे कथानक, आशय, संवाद, व्यक्तिरेखा, बोलीभारुा, प्रमाणभारुा इ. अंगाने दलित नाटकाचे आपण सर्वांगीण बघण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न केलेला आहे. तसेच दलितांच्या नाटकाना जसे प्रायोगिक मूल्य आहे, तसेच वाङ्मयीन अंगानेही ही नाटके कसदार, कलात्मक गुणांनी परिपूर्ण आहेत.सामाजिक बांधिलकीतून ही नाटके लिहिलेली असल्याने त्यामध्ये एक वास्तवता तर आहेच, परंतु त्याबरोबरच एक जिंवतपणादेखील सहज बघायला मिळतो, हे विसरून चालत नाही. हे दलित नाटक 'समतावादी' विचाराचा प्रचार करताना दिसते. त्याचबरोबर तंत्र, प्रयोगशिलता, त्याचबरोबर नाटकातील भारुा, संवाद, वाक्प्रचार, म्हणी, पदे, कविता यांच्या अंगानेही उपरोक्त प्रकरणाकडे बघण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१.चव्हाण रामनाथ, बामनवाडा, श्रीविद्या प्रकाशनपुणे, प्रथमावृत्ती १९९१ पृष्ठ ३४
२.त्रिभुवन प्रकाश, थांबा राम राज्य येतय, आनंद प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९८ पृष्ठ२०
३.गज्वी प्रेमानंद, तनमाजोरी, मॅजेस्टीक प्रकाशन मुंबई,प्रथमावृत्ती १९९५ पृष्ठ०२
४.माने लक्ष्मण, 'प्रकाशपुत्र', ग्रंथाली प्रकाशन मुंबई,प्रथमावृत्ती १९९२ पृष्ठ २६
५.गज्वी प्रेमानंद, 'किरवंत', मॅजेस्टिक प्रकाशन मुंबईप्रथमावृत्ती १९९१ पृष्ठ०२
६.गज्वी प्रेमानंद, 'देवनवरी', मॅजेस्टीक प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती १९९८ पृष्ठ २०
७.गज्वी प्रेमानंद, 'किरवंत' मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई प्रथमावृत्ती १९९८ पृष्ठ ०८